अझ्झी, आजी आणि राजमा

लेखिका व चित्रे: सारा गारलँड



अझ्झी, आजी आणि राजमा

मराठी अनुवादः सुशील मेन्सन



त्या देशात युद्ध सुरू झाले होते. तिथेच आपली ही गोष्ट सुरू होते.



ही गोष्ट आहे अझ्झीची.



दिवसेंदिवस युद्ध अझ्झीच्या घराच्या दिशेने आगेकूच करत होते. अझ्झीचे आयुष्य मात्र नेहमीसारखेच छान चालले होते.



अझ्झीचे वडील डॉक्टर म्हणून काम करत.



तिची आई सुंदर सुंदर कपडे शिवत असे.



तिची आजी उबदार घोंगडी बनवत असे.



सकाळी आजी अझ्झीला शाळेत नेत असे.



संध्याकाळी अझ्झीची मित्रमंडळी खेळायला घरी येत.



कधीकधी ते बागेच्या भिंतीवरून डोकावून सैनिकांची कवायत पाहात.



कधीकधी सैन्याची हेलिकॉप्टर आणि मशीन
गन यांचा कर्कश्श आवाज येत असे.



त्यामुळे कोंबड्या अंडी घालायचं सोडून
इथे-तिथे पळू लागत.



एकदा संध्याकाळी फोन वाजला.
अझ्झीच्या वडिलांनी फोनवर काही ऐकले.
त्यांचा चेहरा फिक्का पडला.
ते आपल्या कुटुंबियांना म्हणाले,
“चला लवकर, गाडीत बसा.
आपल्याकडे फार वेळ नाही, सामान बांधण्याएवढासुद्धा!
आपल्याला लगेच हा देश सोडून जावं लागेल. इथे आपल्या जीवाला धोका आहे.”
त्या क्षणी अझ्झीचे आयुष्य कायमचे बदलून गेले.




अझ्झी, तिचे आई-वडील, आजी सगळे घाई करू लागले. वडिलांनी खाण्यापिण्याचे पदार्थ पिशवीत भरले. आईने आजीने नुकतीच शिवलेली घोंगडी सोबत घेतली. अझ्झीने तिचे लाडके टेडी बिअर सोबत घेतले. अझ्झीने आजीच्या अंगावर कोट चढवला.




“मी इथेच राहीन, घराची देखभाल करण्यासाठी,” आजी म्हणाली,
“माझ्या जीवाला काही अपाय होणार नाही. काळजी करू नका. मी नंतर येईन.”
आजीला सोडून जाताना अझ्झीला खूप दु:ख झाले.




आईने अझ्झीला गाडीच्या मागच्या सीटवर आजीच्या घोंगडीत लपवले.
वडील गाडी सुसाट डोंगराच्या दिशेने चालवू लागले.
मन प्रसन्न ठेवण्यासाठी आई गाणी गाऊ लागली.
काही दूर गेल्यावर कुणीतरी गाडी थांबवली. गाडीच्या खिडकीतून टॉर्चचा प्रकाश आत आला. सैनिक ओरडले, “तुमची कागदपत्रं दाखवा.” अझ्झीने काहीच हालचाल केली नाही. आपली कागदपत्रे नाहीत, हे तिला माहीत होते. ती थोडी घाबरली. पण ती सैनिकांच्या नजरेस पडली नाही.
वडील मघापेक्षाही जास्त वेगाने गाडी चालवू लागले.
अझ्झी तहानभूकेने व्याकुळ झाली होती.
आपल्या टेडी बिअरला घट्ट कवटाळून ती पडून राहीली. हळूहळू ती झोपी गेली.



अझ्झीला जाग आली तेव्हा गाडी थांबली होती. सकाळ झाली होती. आईने गाडीचे दार उघडले आणि अझ्झीला उचलून बाहेरच्या थंड हवेत आणले. अतिशय विशाल पण शांत समुद्र अझ्झीच्या दृष्टीस पडला.



समुद्रात थोडं दूर धक्क्यावर एक नाव बांधलेली दिसत होती. सगळे लोक त्या नावेकडे धाव घेत होते. गाडी तिथेच सोडून अझ्झीचे आई-वडिल अझ्झीला घेऊन नावेकडे धावू लागले.



नावेत पोहोचण्यासाठी लोक एकमेकांना धक्काबुक्की करू लागले. प्रत्येकालाच युद्धापासून आपला जीव वाचवायचा होता. अझ्झीच्या आईवडिलांनीही पूर्ण ताकद लावून धक्काबुक्की केली आणि ते पुढे सरकत गेले.



एका शिडीवरून ते खाली उतरले आणि नावेत बसले.
“नाव पूर्ण भरलीय, आता आणखी कुणी बसू नका,” नावाडी ओरडला. त्याने धक्क्याला बांधून ठेवलेला नावेचा दोर सोडला आणि इंजिन सुरू केले. नाव वळू लागली आणि मग बाहेर खुल्या समुद्रात आली.



लाटांवर हेलकावे खात, कित्येक दिवस, कित्येक रात्री नाव समुद्राचे पाणी कापत पुढे जात राहीली.



अझ्झीने आपल्या सुकलेल्या ओठांवरून जीभ फिरवली तेव्हा खारट चव लागली. तिने आपल्या टेडी बिअरला कुरवाळले. त्याचे केस खाऱ्या पाण्यामुळे कडक झाले होते. ती झोपायचा प्रयत्न करू लागली. पण आजीने दिलेली घोंगडी ओलसर आणि गार झाली होती.



मग एके दिवशी नवी पहाट उगवली. आभाळात फक्त एकच तारा होता. समोर गुलाबी-राखाडी रंगाची जमीन दिसू लागली. अझ्झी आयुष्यात पहिल्यांदाच एक नवीन देश बघत होती.





नव्या देशात सारे काही वेगळेच होते. लोक वेगळे दिसत होते. त्यांनी अझ्झीला खायला जे अन्न दिले त्याची चवसुद्धा वेगळीच होती.



तेथील लोकांची भाषा अझ्झीच्या आईवडिलांना अजिबात समजत नव्हती.



मग एक माणूस आला. तो अझ्झीच्या वडिलांशी त्यांच्या भाषेत बराच वेळ बोलला.



काही वेळाने एक बस आली. ती त्यांना त्यांच्या नव्या घरी घेऊन गेली.



पण हे घर आधीच्या घरापेक्षा खूप वेगळे आणि लहान होते. यात फक्त एकच खोली होती. बाथरुम खोलीच्या बाहेर होते.

“हे बघ अझ्झी, काही दयाळू लोकांनी आपल्याला हे फर्निचर आणि भांडी दिलीयत,” आई म्हणाली.

“मला इथे नोकरी करायची परवानगी मिळाली की आपण छान घरात जाऊ,” वडील म्हणाले.

अझ्झीच्या मनात आले, “आजी नसलेलं घर छान कसं असू शकेल?”



कित्येक दिवस अझ्झी आईसोबत त्या मोठ्या शहराच्या रस्त्यांवरून भटकत होती. शेवटी अझ्झीला प्रवेश मिळेल अशा शाळेची माहिती आईला मिळाली.



अझ्झीची आपल्या नव्या शिक्षकांशी ओळख झाली. शिक्षकांनी तिच्याशी हस्तांदोलन केले आणि ते मायेने म्हणाले, “हॅलो अझ्झी, मी *मिलर* सर. आपण सोमवारी वर्गात भेटू.” अझ्झीच्या आईने *सोमवार* हा शब्द ऐकला. तिने मान हलवली आणि मंद स्मित केले.



रविवारी रात्री आईने अझ्झीला सोफ्यावर झोपवले. अझ्झीच्या मनात जुन्या युद्धखोर देशात एकटीच राहात असणाऱ्या आजीचा विचार आला.



मग ती नव्या शाळेचा विचार करू लागली.
“इथली भाषा येत नसताना आपण इतर मुलांशी मैत्री कशी करायची?
नव्या शिक्षकाचं बोलणं आपल्याला कसं समजणार?”



शाळेत खूप गोंगाट होता. अझ्झीच्या आसपास मुले इकडेतिकडे पळत होती. त्यांचे कपडे वेगळे होते, त्यांची भाषा वेगळी होती. अझ्झीला *हॅलो*सुद्धा म्हणायला कुणी थांबले नाही.



मग घंटा वाजली. अझ्झी इतर मुलांमागोमाग मिलर सरांच्या वर्गात शिरली. रडवेली होत ती स्वत:शी म्हणाली, “मी रडणार नाही.”



मिलर सरांनी टाळी वाजवून मुलांना शांत केले. ते म्हणाले, “आजपासून अझ्झी ही एक नवीन मुलगी आपल्यासोबत वर्गात असेल. आपण तिचे स्वागत करूया.” मिलर सर काय म्हणाले ते अझ्झीला समजले नाही.



मग अझ्झीच्या कानावर तिच्या मातृभाषेतील शब्द पडले.



अतिशय शांत आणि मृदू आवाजात कुणीतरी अझ्झीशी बोलू लागले.



अझ्झीला दयाळू चेहऱ्याची एक स्त्री दिसली. ती म्हणाली, “हॅलो अझ्झी, मी *सबीन* मॅडम. तुला मदत करायला आलेय मी.”



सबीन मॅडमने अझ्झीला मिलर सर काय म्हणत होते, ते सांगितले. तिने अझ्झीला नव्या भाषेतील काही शब्द शिकवले. लवकरच, अझ्झी *हॅलो, गुडबाय* आणि *माझं नाव अझ्झी आहे* हे शब्द बोलायला शिकली.



पण दुपारच्या सुटीत अझ्झीला पुन्हा एकटेएकटे वाटू लागले. तिच्या आईने डब्यात दिलेला खाऊ इतर मुलांच्या डब्यातील खाऊपेक्षा खूप वेगळा होता.



खाऊ खाल्ल्यावर खुंटीवरचा कोट अंगावर चढवून ती मैदानात पळाली.



एक मुलगी तिच्याकडे धावत आली. “हॅलो, मी *ल्युसी,*” ती म्हणाली. सबीन मॅडमने नुकतेच शिकवलेले शब्द आठवून अझ्झी म्हणाली, “गुडबाय, माझं नाव अझ्झी आहे.”



“तुला हॅलो म्हणायचंय का?,”ल्युसी हसतहसत म्हणाली. “गुडबाय, माझं नाव अझ्झी आहे,” अझ्झी पुन्हा म्हणाली. ल्युसी पुन्हा हसू लागली. मग अझ्झीसुद्धा हसू लागली. “चल, दोरीउड्या खेळू,” ल्युसी म्हणाली.



ल्युसी दोरीउड्या खेळू लागली आणि अझ्झी ते पाहू लागली. पाच उड्या मारल्यानंतर ल्युसीचा पाय दोरीत अडकला आणि ती थांबली. आता अझ्झीची पाळी होती.



अझ्झीने वीस दोरीउड्या मारल्या. मग तिचाही पाय दोरीत अडकला आणि ती थांबली. त्या दिवशी अझ्झी एक नवा शब्द शिकली – *स्कीप* (दोरीउड्या).



दिवस सरू लागले तसे सबीन मॅडम अझ्झीला शाळेच्या उपक्रमात मदत करू लागली. एके सकाळी अझ्झीने मशीनगन लावलेल्या हेलिकॉप्टरचे चित्र काढले.



अझ्झीने सबीन मॅडमला ती आईवडिलांसोबत कशी पळून आली आणि आजीला एकटे सोडून येताना तिला किती वाईट वाटले वगैरे युद्धाची कहाणी सांगितली. “तुझ्या भावना मी समजू शकते, अझ्झी. मीसुद्धा सहा वर्षांची असताना माझा देश सोडून इथे आले,” सबीन मॅडम म्हणाल्या.


सबीन मॅडमने अझ्झीला तिची गोष्ट सांगितली.
“मी कुटुंबियांसोबत जंगलातून प्रवास केला,
आम्ही नद्या पार केल्या,
डोंगर चढलो-उतरलो,
शेवटी, आम्ही एका शिबिरात पोहोचलो.
काही वर्ष आम्ही तिथेच राहिलो.
मग मला पुढे जायची परवानगी मिळाली.
पण कुटुंबियांना मागेच राहावे लागले. ही सर्वात दु:खद गोष्ट होती.
पण एक दिवस ते मला येऊन भेटतील. तुलाही तुझी आजी कधीतरी येऊन भेटेल,” सबीन मॅडम म्हणाल्या.




सबीन मॅडम अझ्झीच्या आईला नेहमी भेटत असे.
एकदा त्या म्हणाल्या, “अझ्झी शाळेत लक्ष देऊन ऐकते. तिचं इंग्रजी दिवसेंदिवस सुधारतंय.”
“पण ती तिची मातृभाषा विसरायला नको,” आईने शंका काढली.
“अजिबात नाही, ती दोन्ही भाषा बोलेल, अगदी माझ्यासारखं!” सबीन मॅडम हसत म्हणाल्या.



घरी जात असताना त्यादिवशी आपण कोणते नवे इंग्रजी शब्द शिकलो, ते आईने अझ्झीला सांगितले - *मला ते हवंय* आणि *त्याची किंमत काय?* तसेच *केळी.*



अझ्झीनेही आईला त्यादिवशी तिने शाळेत शिकलेले नवे शब्द सांगितले - *मी हे घेऊ का?* आणि *हे काय आहे?* तसेच *आजी.*



वडील घरी आले तेव्हा खूप थकले होते. त्यामुळे त्यादिवशी आपण कोणते नवे इंग्रजी शब्द शिकलो, हे ते सांगू शकले नाहीत. ते पलंगावर पडून राहीले. आई रात्रीचा स्वयंपाक करत होती.
“तुम्हाला नोकरी मिळाली का बाबा?” अझ्झीने विचारले.
“नाही अझ्झी, इथे नोकरी करायची परवानगी मला मिळाली नाहीए अजून,” वडील म्हणाले. “माझी एखादी बाग असती तर निदान मी त्यात काही धान्य तरी पेरलं असतं. त्यातून आपल्याला पोटाची खळगी भरता आली असती. पण आता माझ्याकडचं बियाणं काही कामाचं नाही. माझ्याकडे काहीच काम नाही,” असे म्हणून त्यांनी आपले डोळे मिटले.



शाळेत अझ्झी हातांची बोटं वापरून एक ते दहा संख्या इंग्रजीतून मोजायला शिकली.
“लवकरच तुम्ही पावलांचीही बोटं मोजायला शिकाल,” सबीन मॅडम म्हणाल्या.



मधल्या सुट्टीत अझ्झी ल्युसीसोबत डबा खात असे. ल्युसी म्हणत असे, “मला तुझा हा राजमा मसाला खूप आवडतो”



मग वसंत ऋतूतील एका ऊबदार दिवशी मिलर सर वर्गातील मुलांना म्हणाले.
“उद्या आपण बागकाम शिकणार आहोत. आपण शाळेच्या बागेत काही बिया पेरू.
आपण काय काय उगवायचं याचं चित्र कोण काढून दाखवेल?”
“मी,” सगळे एका सुरात ओरडले.


मुलांनी चित्रे काढली.
टोमॅटो
कोबी
भोपळा
सूर्यफूल
अझ्झी जुन्या घरातील बागेचा विचार करू लागली.... तेथील हिरवे टोमॅटो लाल कसे व्हायचे, कोबीवर पानांचे थर कसे पसरायचे, भोपळ्याची वेल कुंपणावर कशी चढायची, आपण आवडता राजमा मसाला खात असताना सूर्यफुल त्याचे तोंड स्वयंपाकघराकडे कसे वळवायचा....
जागेवरून उठून अझ्झी फळ्याकडे गेली. फळ्यावर तिने राजमाचे बी काढले. “व्वा अझ्झी!” मिलर सर म्हणाले. “आपण सारे राजमा खातो. राजमाचे दाणे आपण मातीत पेरले तर त्यातून रोपटं उगवतं. या रोपट्यातून आपल्याला राजमाचे भरपूर दाणे मिळतात.” त्याक्षणी, अझ्झीला एक भन्नाट कल्पना सुचली.


मग ती वडिलांच्या पिशवीतील राजमाच्या बिया आणायला घरी आली.
ती स्वत: राजमाच्या बिया शाळेच्या बागेत पेरणार होती.
आणि आपल्या वडिलांना आश्चर्यचकीत करणार होती.
अझ्झीने घाईघाईत वडिलांची पिशवी काढली.
पण तिने पिशवीत पाहिलं तर ती रिकामी होती.
इतक्यात तिला राजमा मसाल्याचा वास जाणवला.
“अझ्झी, आज मी तुझा आवडता राजमा मसाला बनवलाय,” आई म्हणाली.
अझ्झीच्या डोळ्यातून घळाघळा पाणी वाहू लागले.
“थकलीस का गं छकुले?”
आईला अझ्झीचे दु:ख समजले नाही.



त्यादिवशी आवडता राजमा मसाला अझ्झीच्या घशाखाली उतरला नाही. आपण पेरलेल्या राजमाच्या दाण्यांमधून रोपटी उगवली असती, ती उंच झाली असती, त्यांना भरपूर शेंगा लागल्या असत्या, त्यातून आईबाबांना आणि सगळ्या शाळेला राजमा खायला मिळाला असता, त्यामुळे बाबांना आनंद झाला असता वगैरे विचार तिच्या मनात येऊ लागले.



अझ्झीला झोप येत नव्हती. ती जुन्या घरातील दिवस आठवू लागली. आई तिच्यासाठी कसे छान कपडे शिवायची, आपण आजीसोबत कसे सूत कातायचो वगैरे. पण मग पुन्हा तिला चिंता वाटू लागली, “या नव्या देशात ते सुरक्षित आहेत का? आजीला जुन्या घरी काही धोका तर नाही?”


अचानक अझ्झी पटकन उठली. तिला उशीखाली काहीतरी असल्याचे जाणवले.
राजमाचे दाणे! मागे काही दाणे पिशवीतून खाली पडले होते. पण सगळे ते विसरून गेले.
हे दाणे कुणी शिजवून खाल्ले नव्हते.
शाळेच्या बागेत लावायला हे आठ दाणे अझ्झीला पुरेसे होते.
सोफ्यावर चढून अझ्झीने ते दाणे तिच्या कोटाच्या खिशात ठेवले.
मग आजीच्या घोंगडीत स्वतःला लपेटून ती आनंदाने झोपी गेली.



राजमाचे आठ दाणे! आज त्यांना शाळेच्या बागेत पेरायचे होते. अझ्झीने आठ काठ्या मातीत रोवल्या. प्रत्येक काठीच्या शेजारी राजमाचा दाणा पेरण्यासाठी तिने एक भोक केले.



“राजमा पेरण्याची ही पद्धत तुला कुणी शिकवली, अझ्झी?” मिलर सरांनी विचारले.
“आजीने,” अझ्झी उत्तरली.
“आणि आता तू आम्हाला शिकवतेयस,” सबीन मॅडम म्हणाल्या.



शाळेतून घरी परतताना अझ्झी शाळेच्या बागेत राजमा कसे उगवतील, याबद्दलच विचार करत होती.



पण आईकडेही अझ्झीसाठी एक गोड गुपीत होते. ती गालातल्या गालात हसत होती.



त्यांनी रस्ता ओलांडला.



ते घराच्या दरवाजासमोर आले.


आई म्हणाली, “अझ्झी, डोळे बंद कर पाहू.”
“हं, आता डोळे उघड,” आई म्हणाली.
अझ्झी किंचाळली, “आजी!”
अझ्झी पट्कन आजीच्या कुशीत शिरून आनंदाने रडू लागली. आजीच्या डोळ्यातही आनंदाश्रू उभे राहीले. आई-बाबाही गहिवरले.


आजी खूप थकली होती. पोटात अन्न गेल्यावर तिने आपली कहाणी सांगितली.
“काही दुष्ट लोक बंदुका घेऊन घरात शिरले. मी घाबरले.
आपलं घर, बाग, कोंबड्या हे सारं तसंच सोडावं लागलं मला.
इथे येण्यासाठी मी माझ्या सोन्याच्या बांगड्या विकल्या,
एका मोठ्या ट्रकमधून मी रात्रभर खडतर आणि धोकादायक प्रवास केला.
दिवसा आम्ही थांबून कुठेतरी लपून राहायचो.
इथे आल्यावरसुद्धा मला परत पाठवतील की काय, अशी भीती होती.
इथे राहायची परवानगी मिळाली तेव्हा कुठे जीव भांड्यात पडला.
सध्यातरी आपण सुरक्षित आहोत आणि एकत्र आहोत. माझ्यासाठी एवढेही खूप आहे.”



त्या छोट्याशा घरात राहून बरेच आठवडे झाले. एके सकाळी वडिलांची कागदपत्रे आली. ते आनंदाने ओरडले, “आपण इथे कायमचं राहू शकतो, अगदी सुरक्षित. मी नोकरीसुद्धा करू शकतो. चला निघू.”



ते सर्वांसोबत घराबाहेर पडले. सर्वांना कोपऱ्यावरच्या एका घरात घेऊन गेले. या घराला अंगण होते.



“आता मी नोकरी करू शकतो. त्यामुळे आपण इथे राहू शकतो,” वडील म्हणाले. “या घरात दोन खोल्या आणि बाथरुम आहे. अंगणात आपण भाज्या उगवू शकतो.”
“माझं शिलाई मशीन ठेवायलासुद्धा छान जागा आहे,” आई म्हणाली.
“सूतकताईचं काम करायलासुद्धा पुरेशी जागा आहे मला,” आजी म्हणाली.
“मला आणि ल्युसीला दोरीउड्या मारायला खूप जागा आहे इथे,” अझ्झी म्हणाली.
तिच्या मनात आले, “हे नवं घर तसं जुन्या घराइतकं चांगलं नाही. पण इथेसुद्धा मजेत राहाता येईल.”



त्या उन्हाळ्यात अझ्झी शाळेत काही
नव्या गोष्टी शिकली.




घरी आजी आणि अझ्झी भूतकाळातल्या
आठवणींमध्ये रमू लागल्या.



मग दुसऱ्या देशातला एक मुलगा, *जमाल* तिथे आला.
अझ्झी आणि ल्युसीने त्याला इंग्रजी भाषा शिकायला
मदत केली. जमाल दोरीउड्या खूप छान खेळायचा.



शाळेच्या बागेतील राजमाच्या वेली
काठ्यांच्या आधाराने वाढू
लागल्या. वेलींच्या फुलांवर
मधमाशा घोंगावू लागल्या. काही
काळाने फुलांच्या शेंगा बनल्या.
त्यात राजमाचे दाणे वाढू लागले.



उन्हाळा संपत आला. शाळेच्या बागेतील राजमाच्या रोपट्याची खोडे तपकिरी आणि शुष्क बनली. त्याच्या शेंगा हलवल्यावर आतील राजमाच्या दाण्यांचा खडखड आवाज येऊ लागला.
“असा आवाज येऊ लागला की आम्ही शेंगा फोडून आतले दाणे बाहेर काढायचो,” अझ्झी म्हणाली.
मग सगळी मुले, मिलर सर आणि सबीन मॅडम यांनी मिळून शेंगांमधून राजमाचे दाणे वेगळे काढले.
“अझ्झी, यातले थोडे दाणे मी पुढल्या वर्षी पेरण्यासाठी ठेवू का? म्हणजे, पुढल्या वर्षी सगळ्या शाळेला खायला पुरेल इतके राजमा उगवता येतील.” मिलर सरांनी विचारले.
“का नाही सर!” अझ्झी चक्क नव्या इंग्रजी भाषेत बोलली..



अझ्झी शाळेच्या बागेतील राजम्याचे दाणे घेऊन घरी आली. बाबांनी डोळे विस्फारून त्यांच्याकडे पाहीले. दाणे हातात घेऊन ते म्हणाले, “आपण आपल्या जुन्या देशातून आणलेल्या दाण्यांसारखेच आहेत हे!”
“हो, त्यातले आठ दाणे मला उशीखाली सापडले. मी ते शाळेच्या बागेत पेरले. त्यातूनच उगवलेयत हे.”
वडिलांनी कौतुकाने अझ्झीचे पापे घेतले..




त्यांनी नव्या घराच्या अंगणात पेरण्यासाठी काही दाणे बाजूला काढले.



आजीने राजमा मसाला बनवण्यासाठी काही दाणे घेतले.



उरलेले दाणे आईने हिवाळ्यात खाण्यासाठी बरणीत भरून ठेवले.



“बाबा, आता तुम्ही खुश आहात ना?” अझ्झीने विचारले.
“हो तर! खूप जास्त खुश आहे मी,” वडील म्हणाले.
“मी आज राजमा मसाला बनवण्याचा विचार करतेय,” आई म्हणाली.
“नवीन राजमा, नवीन आयुष्य,” राजम्याचे भांडे उचलत आजी म्हणाली.
टेडी बिअरच्या चेहऱ्यावर हसू फुलले. कारण त्याच्या चेहऱ्यावर नेहमीच हसू फुललेले असते.





अझ्झी आणि तिचे आईवडील संकटात आहेत....

त्यांना आपले घर, आपला देश सोडून दुसऱ्या देशात जाणे भाग पडते. तेथील नवी भाषा शिकणे, नव्या लोकांमध्ये राहाणे भाग पडते. अझ्झी धैर्याने आणि हिंमतीने नव्या वातावरणाशी स्वत:ला जुळवून घेते. पण अझ्झीची आजी अद्याप जुन्याच देशात आहे. अझ्झी आपल्या आजीला पुन्हा भेटू शकेल?

अतिशय हळूवारपणे आणि विनोदी अंगाने सांगितलेली ही गोष्ट सर्व वयाच्या वाचकांना आनंद देऊन जाते.





ISBN 978-1-84780-261-3
51799
9 781847 802613
UK£12.99 US$17.99
FRANCES LINCOLN CHILDREN'S BOOKS
www.franceslincoln.com